# <u>बिनतारी संदेश</u>

प्रति :— सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी,नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसर , राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, नवी मुंबई

प्रत माहितीस्तव :— पोलीस उप आयुक्त परिमंडळ १व २,सर्व विभागीय सहा.पोलीस आयुक्त.

प्रेषक :— पोलीस उप आयुक्त मुख्यालय, नवी मुंबई

---

जा.क्र.पोआ/नमुं/डायल ११२/बॅच २/प्रशिक्षण/२३/२०२५ दिनांक :— ११/०४/२०२५

---

मजकूर

डायल ११२ ही प्रणाली पोलीस दलातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना समजण्यासाठी व नित्याच्या वापरास सुलभ होण्यासाठी व सदर प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वित राहण्यासाठी प्रशिक्षित पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची आवश्यकता असते त्याकरिता सदर प्रकल्प कार्यान्वित करणाऱ्या मे महिंद्रा डिफेन्स सिस्टिम लि. यांच्याकडुन सर्व पोलीस घटकांतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पर्यवेक्षक (Supervisor),प्रेषक (Dispatcher), प्रतिसादक (Responder) चे निश्चित केलेल्या संख्येनुसार प्रत्येक वर्षी प्रशिक्षण देण्यात येते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे येथील MDT वर कार्यरत प्रतिसादक (Responder) यांना ०६ दिवसांचे एकुण ०८ बॅचमध्ये देण्यात येणार असुन प्रत्येक बॅचमध्ये ७६ प्रशिक्षणार्थीचा समावेश आहे डायल ११२ प्रशिक्षणाची दुसरी बॅच सोमवार दिनांक १४/०४/२०२५ ते शनिवार दिनांक १९/०४/२०२५ या कालावधी मध्ये होणार आहे.

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी **प्रत्येकी ०३ पोलीस अंमलदार** , **राखीव पोलीस निरीक्षक यांनी ०५ पुरूष व ०५ महिला पोलीस अंमलदार** , **नियंत्रण कक्ष प्रभारी अधिकारी यांनी ०३ पोलीस अधिकारी** डायल ११२ प्रशिक्षणाकरिता पाठवावे. ज्या पोलीस अंमलदार यांचे कंपनी प्रतिनिधी मार्फत डायल ११२ चे ६ दिवसांचे **यापुर्वी प्रशिक्षण झालेले आहे असे पोलीस अंमलदार प्रशिक्षणाकरिता पुन्हा पाठवु नये** त्याकरिता प्रशिक्षण झालेल्या पोलीस अंमलदारांची यादी पोलीस ठाणेंच्या ई मेल आयडी तसेच डायल ११२ व्हॉटस अप ग्रुप वर पाठविण्यात आलेली आहे. प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात येणाऱ्या पोलीस अंमलदार यांना खालील सुचना दयाव्यात व सदर सुचनांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत आदेशित करावे.

१. डायल ११२ प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात येणारे पोलीस अंमलदार हे शासकीय गणवेशात सोमवार दिनांक १४/०४/२०२५ रोजी सकाळी ०९०० वाजता प्राथमिक संपर्क केंद्र, मिलेनियम बिजनेस पार्क, महापे नवी मुंबई येथे हजर राहतील.

२. सर्व प्रशिक्षणाथी पोलीस अंमलदार यांच्या कडे नोटबुक व पेन सोबत असणे आवश्यक आहे.

३. संपुर्ण प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतेही पोलीस अंमलदार यांना कोणत्याही प्रकारची रजा अथवा साप्ताहिक सुटटी दिली जाणार नाही तातडीच्या प्रसंगी मा.पोलीस उप आयुक्त, मुख्यालय नवी मुंबई यांची परवानगी घ्यावी.

४. काही पोलीस ठाणे प्रशिक्षणाकरिता आलेले पोलीस अंमलदार यांचे पहिल्या दिवसाचे प्रशिक्षण पुर्ण झालेनंतर काही कारणास्तव दुसऱ्या दिवशी त्यांच्याबदली नवीन पोलीस अंमलदार पाठवितात.प्रशिक्षणाकरिता पाठविलेल्या पोलीस अंमलदारांचे पहिल्या दिवसांचे प्रशिक्षण पुर्ण झालेनंतर कोणत्याही परिस्थिती मध्ये त्यांचेबदली नवीन पोलीस अंमलदार कोणतेही पोलीस ठाणे पाठविणार नाही.

५. डायल ११२ प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात येणारे पोलीस अधिकारी व अंमलदार हे कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन करणार नाही तसेच प्रशिक्षणादरम्यान देण्यात येणा—या सुचनांचे पालन करतील.

६. डायल ११२ प्रशिक्षणाकरीता पाठविण्यात येणारे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची नावे इकडील कार्यालयास cpnmdial112@gmail.com या ई—मेल आयडी वर सादर करावी.

**(संजयकुमार पाटील)**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
नवी मुंबई

प्रत,

पोलीस पत्रक,प्रसिध्दिकरिता